# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/ईमेल/२०२०                                        दिनांक:- ११ जानेवारी, २०२०

जळगांव दि.११ (      ):- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात आयोजित त्रिवेणी शिखर परिषदेला शनिवारी मोठया उत्साहात प्रारंभ झाला. उद्योजक, व्यावसायिक आणि विद्यार्थी यांनी विविध विषयांवर चर्चा करत खान्देशात व्यावसायिक मूल्ये रुजवण्याचा संकल्प या परिषदेत केला.

त्रिवेणी शिखर परिषदेची सुरुवात सकाळी ९ वाजता झाली. त्यावेळी विद्यापीठाच्या संशोधन कार्यासह उपलब्ध शैक्षणिक सुविधा व अभ्यासक्रमांची सर्वंकष माहिती समन्वयक प्रा.भूषण चौधरी यांनी उपस्थित उद्योजकांना करुन दिली. या नंतर दीक्षांत सभागृहात उद्योजकांसमवेत समुह चर्चासत्र आणि अधिसभा सभागृहात विद्यार्थ्यांकरीता चर्चासत्र आयोजित करण्यात आले.

दीक्षांत सभागृहात सकाळ सत्रात वस्तू व सेवा करबाबतचे धोरण, कायद्यातील सुधारणा/बदल आणि त्यातील आव्हाने या विषयावर समुह चर्चा करण्यात आली. या चर्चेत कर सल्लागार सीए दर्शन जैन (जळगाव), यांच्या अध्यक्षतेखाली सीए अविनाश घुंडयाल(धुळे), जळगाव येथील केंद्रीय उत्पादन शुल्काच्या वस्तू व सेवा कर विभागाचे अधिक्षक डी.आर. गुप्ता, आणि एस.के फॉर्म्युलेशन इंडीया प्रा. लि.मुंबई चे व्यवस्थापकीय संचालक सचिन जोशी या गटाने उपस्थित उद्योजकांशी चर्चा केली.

या नंतरच्या सत्रात बँकींग आणि वित्तीय पुरवठा या विषयावर समुह चर्चा झाली. या चर्चेत सीए श्रीराम देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली जळगाव येथील जळगाव जनता सह. बँकेचे अध्यक्ष सीए अनिल राव, बँक ऑफ महाराष्ट्र जळगावचे विभागीय व्यवस्थापक वीणा राव, स्टेट बँक ऑफ इंडीया जळगाव शाखेचे प्रदेश व्यवस्थापक सुशीलकुमार आणि खाजगी वित्तीय सेवा व्यावसायिक अशोक दुगाडे या गटाने उपस्थित उद्योजकांशी चर्चा केली. उद्योजकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

अधिसभा सभागृहात सकाळ सत्रात मुंबई येथील निर्माण रिटेलर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. चे व्यवस्थापकीय संचालक अजित मराठे यांचे उद्योजक/व्यावसायिक का व्हावे या विषयावर व्याख्यान झाले. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राचे महत्त्व व त्यातील संधी याबाबतची माहिती दिली. यानंतर, मुंबई येथील एल ॲण्ड टी लि.चे माजी उपाध्यक्ष अशोक शहाणे यांनी उद्योग व्यवस्थापनाचे कौशल्य आणि कार्यप्रणाली या विषयावर व्याख्यान झाले. विद्यार्थ्यांना त्यांनी उद्योजक होण्यासाठी आवश्यक असलेले कौशल्य, गुण अतिशय सोप्या पध्दतीने समजवून सांगितले. त्यानंतर, नाशिक येथील इंडियन सोरींग कॉर्पोरेशनचे प्रदीप पेशकर यांचे भारत सरकारच्या स्टार्ट-अप योजने संदर्भात व्याख्यान झाले. यासत्रामध्ये स्टार्ट-अप संदर्भात १५ विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले. त्यांना उद्योजकांनी मार्गदर्शन केले.

सायंकाळी या परिषदेचे औपचारिक उदघाटन प्र-कुलगुरु प्रा. पी. पी. माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी नवी दिल्लीच्या नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे चेअरमन आणि व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. एच. पुरुषोत्तम हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी मंचावर अतिथी म्हणून ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. अजित पाटणकर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री ॲण्ड ॲग्रीकल्चरचे चेअरमन संतोष मंडलेचा, सॅटर्डे क्लवचे अध्यक्ष अशोक दुगाडे, विश्वस्त विजय परांजपे, डॉ.अजित मराठे, रुपाली ठाकूर, व्ही.पी.कुलकर्णी तसेच व्ही.एस. हर्डीकर, प्र.कुलसचिव प्रा.बी.व्ही. पवार, छबीराज राणे उपस्थित होते. संयोजक सचिव प्रा.भूषण चौधरी यांनी प्रास्ताविक केले. सॅटर्डे क्लबची भूमिका अशोक दुगाडे यांनी मांडली. रश्मी गोखले व गिरीश कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. सचिन दुनाखे यांनी आभार मानले.

यावेळी भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात इनोव्हेशन फॅसिलीटेशन सेंटर उभारणी संदर्भात सामंजस्य करार करण्यात आला.

उद्या रविवारी दिवसभर विविध  विषयांवर चर्चा होणार असून सायंकाळी परिषदेचा समारोप होईल.

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी/ईमेल/२०२० दिनांक ११ जानेवारी, २०२०

प्रति,
मा.संपादक,/प्रतिनिधी,

कृपया, वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्दीस देऊन सहकार्य करावे ही विनंती.

आपला विश्वासू,
(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२०** **दिनांक:- ११ जानेवारी, २०२०**

जळगाव दि. ११ (                ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास आणि संशोधन प्रशाळेत शुक्रवार रोजी निमंत्रित महिलांचे कवीसंमेलन आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानी, भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक प्रा.म.सु.पगारे होत. कवीसंमेलनात विमल वाणी, माया धुप्पड, मीना सैंदाणे, उषा हिंगोणेकर, अस्मिता गुरव, योगिता पाटील, पुष्पा साळवे, मुक्ता महाजन यांनी कविता सादर केल्या.  समाज, प्रेम आणि स्त्री जाणिव विषयक कविता सादर करण्यात आल्या. तसेच गझल, लोकगीत ही सादर करण्यात आले. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त या काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक, डॉ.पगारे यांनी समारोप प्रसंगी कविता प्रतिभा शक्तीतून व्यक्त होतात आणि अशा कविता कधीही कंटाळवाण्या होत नाहीत. त्यामुळे विद्यार्थी देखील चिकित्सक भूमिकेतून कवितेकडे पाहतात असे मत मांडले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. आशुतोष पाटील यांनी प्रस्ताविक केले. सुत्रसंचलन मनिषा महाजन व महेश सुर्यवंशी यांनी केले. नेत्रा उपाध्ये यांनी आभार मानले.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी